# आम्हीं ह्या सुधारणा सुचवतों

१. विद्यार्थ्यांना नापास करूं नका.
२. निर्बुद्ध वाटणाऱ्या मुलांसाठीं दिवसभराची शाळा ठेवा.
३. आळशासमोरसुद्धां कांहीं उद्दिष्ट ठेवा.

## १. नापास करूं नका

**टर्नर** फक्त चांगले बनलेले तेवढेच भाग पोंचवण्याची परवानगी लेथवर काम करणाऱ्या कामगाराला नसते. नाहींतर सारेच भाग चांगले बनावेत म्हणून तो धडपडणारच नाहीं.

पण तुम्हीं – तुम्हीं मात्र मनाला येईल तेव्हां आपल्याला न आवडणारे भाग टाकून देऊं शकतां. नक्कींच पास होतील असे आणि तेसुद्धां कांहीं शाळेमुळं नाहींच, बाहेरच्याच गोष्टींमुळं – अशांचींच काळजी घेण्यात तुम्हांला धन्य वाटतं.

**लघुतम साधारण विभाजक** ही पद्धत आज बेकायदेशीर आहे.

३४ व्या कलमामधें घटनेनं प्रत्येकाला आठ वर्षं शाळेच्या शिक्षणाचं आश्वासन दिलं आहे. आठ वर्षं याचा अर्थ आठ वेगवेगळ्या यत्ता. प्रत्येक यत्तेंत दोन वर्षं घालवून चार यत्ता नव्हेत. एरवीं कलम चौतीस हा घटनासमितीला न शोभणारा आणि दळिद्री असा शब्दांचा खेळ ठरेल.

माध्यमिक शाळेंतल्या शेवटच्या यत्तेंपर्यंत पोंचणं ही आज चैनीची गोष्ट नाहीं. ती किमान सांस्कृतिक गरज आहे, तो प्रत्येकाचा हक्क आहे. ज्या माणसाला तो मिळत नाहीं तो समान नाहीं.

**स्वाभाविक कल** चांचणी घेऊन स्वाभाविक कल ठरवण्याच्या वर्गीय सिद्धांतामागं यापुढं तुम्हांला दडतां येणार नाहीं.

सगळ्या विषयांत पास होऊन माध्यमिक शाळेच्या तिसऱ्या यत्तेपर्यंत पोंचण्याइतका पुरेसा 'कल' प्रत्येक मुलाजवळ असतोच.

'हा विषय तुझ्यासाठीं नव्हेच' असं एखाद्या मुलाला सांगणं इतकं सोयीचं आहे! तो मुलगा तें मान्य करेल. कारण तो शिक्षकाइतकाच आळशी आहे. पण त्याला ठाऊक असतं कीं आपले शिक्षक कांहीं आपल्याला 'समानां'त गणत नाहींत.

अन् दुसऱ्या एखाद्या मुलाला मात्र हाच शिक्षक म्हणतो, 'तूं बघ, ह्याच विषयासाठीं जन्मला आहेस." हें कांहीं शहाणपणाचं लक्षण नाहीं. उलट त्याला एखाद्याच विषयाची वाजवीपेक्षां जास्त गोडी असली तर त्याचा अभ्यास करायची मनाई त्याला केली पाहिजे. त्याची केस 'तोल गमावलेली किंवा 'खास' अशी समजा. एकाच खास विषयांत स्वतःला कोंडून घ्यायला त्याला नंतरच्या आयुष्यांत भरपूर अवधि आहेच.

**किरकोळीनं** कोणत्याहि मार्गानं प्रत्येक मुलाची प्रत्येक विषयांत प्रगति करून घेणं तुम्हांला बंधनकारक असतं तर त्या सर्वांनीं व्यवस्थित अभ्यास करावा असा मार्ग शोधण्यासाठीं तुम्हीं आपल्या बुद्धीला ताण दिला असतां.

मी तर तुम्हांला किरकोळीनंच पैसे देईन. एक विषय शिकणाऱ्या प्रत्येक मुलागणिक इतके! किंवा याहून चांगलं म्हणजे तो विषय शिकूं न शकणाऱ्या प्रत्येक मुलामागं दंड!

मग तुमची नजर नेहमीं गियानीवरच खिळून राहील. सगळ्या मुलांप्रमाणं त्यालाहि देवानं दिलेली बुद्धि तुम्हीं त्याच्या मंद नजरेत शोधाल. कोणत्याहि कुटुंबांत दिसतं तसंच तुम्हीहि बुद्धिमान् मुलाकडे दुर्लक्ष करून तुमची सर्वांत जास्त गरज असलेल्यासाठीं झगडाल. रात्रीं झोंपेंतदेखील त्याचाच विचार करतांना तुम्हांला जाग येईल. आणि त्याला शिकवण्यासाठीं नवेनवे मार्ग शोधायला तुम्हीं धडपडाल – त्याच्या गरजांना पूरक ठरतील असे मार्ग. तो वर्गांत दिसला नाहीं तर त्याला आणण्यासाठी त्याच्या घरीं तुम्हीं जाल.

तुम्हीं स्वतःला स्वस्थ बसूंच देणार नाहीं. कारण जी शाळा गियानींना शिक्षण अपुरं टाकूं देते ती 'शाळा' म्हणवून घ्यायच्या लायकीचीच नाहीं.

**तुम्हीच मध्ययुगीन आहांत** फारच झालं तर आमच्या शाळेंत आम्हीं छडीचादेखील वापर करतों.

उगीच फार शिष्टपणा दाखवूं नका. तुमचे सगळे शैक्षणिक सिद्धांत विसरून जा. तुम्हांला चाबकाची गरज असेल तर मी तो देईन. पण प्रगतिपुस्तकांच्या गठ्ठयावर पडलेलं तें पेन आधीं फेंकून द्या. चाबकाची निशाणी दुसऱ्याच दिवशीं नाहींशी होते. त्या पेनची खूण साऱ्या वर्षभर शिल्लक राहते.

तुमच्या त्या सुंदर 'आधुनिक' पेनमुळं गियानी आयुष्यांत कधींहि एकदेखील पुस्तक वाचूं शकणार नाहीं. त्याला साधं पत्र लिहितां येणार नाहीं. ही प्रमाणाबाहेरची क्रूर शिक्षा झाली.

**गणित** एकाहि विद्यार्थ्याला नापास करतां येत नसेल तर तक्रारीला जागा फक्त गणिताच्या शिक्षकाला राहील. कारण पहिल्या यत्तेचाच अभ्यास न शिकलेल्याला दुसऱ्या-तिसऱ्या यत्तेचे धडे देणं निरर्थक आहे.

पण गणित हा अनेक विषयांमधला एक आहे. न येणाऱ्या गणिताच्या दर आठवड्याच्या तीन तासांमुळं चांगला अभ्यास करता येतो असे बाकीचे २३ तास विद्यार्थ्याला गमवायला लागतां काम नयेत.

**थोडसं पुरे आहे** विधानसभेंत लॅटिनवर झाली तशी एखादी चर्चा इथं आपल्याला गणिताच्या प्रश्नावर करतां येईल.

कामावर किंवा घरीं तांतडीच्या कामांसाठीं कुणाहि माणसाला किती गणित येण्याची गरज आहे? किंवा वर्तमानपत्र वाचण्यासाठीं? दुसऱ्या शब्दांत विचारायचं तर तज्ज्ञबिज्ञ नसलेल्या सामान्य सुसंस्कृत माणसाला कितीसं गणित लक्षांत असतं?

आठवर्षांच्या शिक्षणक्रमांत शिकलेलं साधं अंकगणित – गुंतागुंतीच्या आंकडेमोडी – नि बीजगणित सोडून!

बीजगणित हा शब्द भाषेचा एक अर्थपूर्ण भाग कसा करावा हा प्रश्न उरतोच. पण वर्षभरांतल्या एखाद्या तासांतसुद्धां तें करतां येईल!

## २. पूर्णवेळ शिकवणं

**उजळणी** अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं प्रत्येक विषयाला आठवड्याचे दोन तास हे प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेसे नाहींत, हें तुम्हांला पण पुरतं ठाऊक आहे.

यावर आत्तांपर्यंत आपल्याजवळ ठरीव उच्चवर्गीय तोडगा होता - गरिबानं पुन्हां त्याच यत्तेंत बसावं. मध्यमवर्गीय लोकांसाठीं तुम्हीं शिकवणी देऊं करतां. शाळेच्या तासांनंतर – पैशासाठीं. म्हणजे धड्यांची पुन्हां उजळणी करणं शक्य होतं. आणि उच्चवर्गीय मुलांच्या बाबतींत याची काळजी आधींच घेतलेली असते. कारण त्यांना जें आधींच ठाऊक असतं त्याचीच ते शाळेंत उजळणी करत असतात. पिएरिनोला प्रत्येक गोष्ट घरींच समजावून सांगितलेली असते.

'दोपोस्कुओला' हा याला कितीतरी चांगला पर्याय आहे. मुलगा तोच अभ्यास पुन्हां दुपारीं करेल. पण त्याला वर्ष गमवावं लागणार नाहीं, पैसे खर्चावे लागणार नाहींत आणि त्याच्या प्रयत्नांत आणि – समजा तो नापासच झाला तर – अपयशांत तुम्हीं त्याच्या पाठीशी असाल.

**वर्गविहीन शाळा** हा मुखवटा आपण जरा दूर करूं या. जोपर्यंत तुमची शाळा वर्गनिष्ठ राहते आणि गरिबांना पळवून लावते, तोंपर्यंत श्रीमंताला हुसकावून लावणारी 'दोपोस्कुओला' निर्माण करणं हाच ही व्यवस्था मोडण्याचा प्रामाणिक मार्ग आहे.

आमच्या या उपायामुळं तुमच्यापैकी कुणी अस्वस्थ होतील. पण तरीहि खाजगी शिकवण्या आणि नापास होणारीं इतकीं मुलं यामुळं तर त्यांना कधींच धक्का बसत नाहीं. ते कसले आले आहेत प्रामाणिक!

पिएरिनो कांहीं वेगळ्या वंशांत जन्मलेला नाहीं. तो वेगळा झाला त्याच्या घरच्या – शाळेबाहेरच्या – तासांत मिळणाऱ्या वेगळ्या वातावरणामुळं. बाकीच्या मुलांसाठीं त्यांची स्वतःची

संस्कृति कायम राखून दोपोस्कुओलानं या तोडीचं वातावरणं निर्माण केलं पाहिजे.

**वातावरण** तुम्हांला घाबरवतो 'पूर्णवेळ' हा शब्द! सध्यां तुम्हीं मुलांना कांहीं तासच ताब्यांत ठेवतां. तेंसुद्धां पुरतं कठिण आहे असं तुम्हांला वाटतं. पण खरं तर तुम्हीं कधीं धड प्रयत्नच केलेला नाहीं.

आतांपर्यंत तुम्हीं वर्ग चालवला आहे तो शाळेच्या घंटेच्या दडपणाखालीं आणि जूनपर्यंत पुऱ्या करायच्या अभ्यासक्रमाला धास्तावून! एखादी चर्चा तुम्हीं कधी शेवटापर्यंत चालवूं शकलां नाहींत. समोरच्या कोंवळ्यां मुलांच्या कुतूहलाला कधीं उत्तर दिलं नाहींत. आपलं क्षितिज तुम्हांला कधीं विस्तारतांच आलं नाहीं.

परिणाम असा झाला कीं प्रत्येक गोष्ट तुम्हीं वाईट तऱ्हेनंच केलीत. तुम्हीं सदैव वैतागलेल्या असतां आणि तशींच मुलंहि! कामाच्या तासांनीं नाहीं - तर या वैतागानंच तुम्हांला थकवलं आहे.

**श्रद्धा हवी** अगदीं प्राथमिक यत्तेपासूनच 'दोपोस्कुओला' सुरु करा. अगदीं रविवार, नाताळ, ईस्टर आणि उन्हाळ्याच्या सुट्टींतसुद्धां. मुलांना आणि त्यांच्या पालकांना असं कांहीं दिलेलंच नाहीं तोपर्यंत त्यांना तें नकोच आहे असं कसं म्हणतां येईल.

परिपत्रकाच्या विटलेल्या प्रतीच फक्त पालकांना पाठवून देणारा मुख्याध्यापक – त्यानं 'दोपोस्कुओला' सुरूं करायचा खरोखरीं प्रयत्न केला होता असं नाहीं म्हणतां यायचं. एखादी नवी चांगली वस्तूदेखील बाजारांत जशी जाहिरात-मोहीम काढून

आणली जाते, 'दोपोस्कुओला'ची सुरवात तशीच केली पाहिजे. सुरवात व्हायच्या आधींच विश्वास वाटला पाहिजे.

## पूर्णवेळ काम आणि कुटुंब

**ब्रह्मचर्य** पूर्णवेळ शाळा असं धरून चालते कीं शिक्षकांची कौटुंबिक कर्तव्यं आड येणार नाहींत. जोडप्यानं-पतिपत्नींनीं मिळून - घरीं चालवलेली, ठरीव वेळापत्रक नसलेली आणि प्रत्येकाला खुली असलेली शाळा - हें पूर्णवेळ शाळेचं उत्तम उदाहरण होईल.

गांधींनी हें केलं. त्यांनीं आपलीं मुलं दुसऱ्या मुलांमधें ठेवलीं. तीं आपल्यापेक्षां वेगळीं होण्याचा धोका पत्करूनदेखील! तुम्हांला जमेल हें?

दुसरा उपाय म्हणजे ब्रह्मचर्य!

ब्रह्मचर्य हा सध्यांचा चलतींतला शब्द नाहीं.

येशूच्या मृत्यूनंतर हजार वर्षंपर्यंत धर्मोपदेशकांपुरती चर्चला ही कल्पना कळली होती.

गांधी पस्तीस वर्षांचे असतांना, लग्नाला बावीस वर्षं लोटल्यावर, त्यांना याचा अर्थ उमगला तो शाळेच्या संदर्भांत.

स्वतःचे निर्बीजीकरण करून घेतलेल्या एका कामगाराकडे एकदां माओनं आपल्या सहकाऱ्यांचं लक्ष वेधलं. त्यांनीं त्याचं कौतुक करावं म्हणून. इटालियन 'चिनी' याचा उल्लेख करायला-सुद्धां बिचकतात.

**८८,०००** ब्रह्मचर्य स्वीकारायला तुम्हांला अजून हजार वर्षं लागतील. पण मधल्या काळांत तुम्हांला निदान एवढं करतां येईल : ब्रह्मचर्याच्या विचाराचं गुणगान करा. आणि तुमच्याकडे

असलेल्या अविवाहित शिक्षकांचा चांगला उपयोग करून घ्या.

सगळ्या शाळांतल्या ४ लाख ११ हजार शिक्षकांपैकी ८८ हजार सध्यां अविवाहित आहेत. पैकीं ५५ हजार कधींच लग्न करणार नाहींत. शिकवण्यासाठीं आपण पूर्ण वेळ देऊं शकतों, हें दुर्दैव नसून वरदान आहे – हें दुसऱ्यांना आणि स्वतःलाहि कां सांगत नाहीं?

अविवावहित शिक्षकांत मानवी भावना कमी असतात अशी एक सध्यां समजूत आहे. ती कितपत खरी आहे मला ठाऊक नाहीं.

ज्या दिवशीं शिक्षक ब्रह्मचर्याचा निःस्वार्थीपणं स्वीकार करतील, त्या दिवशीं कदाचित् त्यांना शाळेबद्दल उत्कट आत्मीयता वाटायला लागेल. ते मुलांवर प्रेम करायला लागतील आणि त्यांना पण मुलाचं प्रेम मिळेल. सर्वांत महत्त्वाचं असं कीं एक यशस्वी शाळा चालवण्याचा आनंद त्यांना मिळेल.

## पूर्णवेळ आणि संघटनेचा हक्क

**मोठ्या लढाया** शिक्षक संघटनेचं बातमीपत्र आमच्या वाचण्यांत आलं. त्यांत म्हटलं होतं – "नाहीं! शिकवण्याच्या तासांत वाढ! – शक्य नाहीं! शिकवण्याच्या कामाचं वेळापत्रक कमी करण्यासाठीं मोठेमोठे लढे झाले. आतां पुन्हां मूळपदावर येणं हा मूर्खपणा ठरेल!"

आम्हांला धक्काच बसला. स्पष्ट सांगायचं तर एकहि शब्द आमच्या तोंडून निघत नाहीं. प्रत्येक कामगार आपले कामाचे तास कमी करण्यासाठीं लढा देत असतो आणि त्यानं तें करावंहि.

**असामान्य विशेष हक्क** पण तुमचं कामाचं वेळापत्रक खरोखरींच लाज आणणारं आहे.

मजूर वर्षाकाठीं २१५० तास काम करतो. सरकारी नोकरी-मधले तुमचे सहकारी १६३० तास काम करतात. आणि तुम्हीं जास्तींत जास्त ७३८ पासून कमींत कमी ४६८ तास काम करत असतां.

आपल्याला घरीं अभ्यास असतो आणि पेपर तपासावे लागतात, हा तुमचा खुलासा कांहीं खरा नाहीं. न्यायाधिशांनासुद्धां आपलीं निकालपत्रं कोर्टाबाहेरच लिहावीं लागतात. खेरीज तुम्हांला चांचण्या टाळतां येतील किंवा घेतल्याच तरी त्या घेतांघेतांच मुलांबरोबर वर्गांतच पेपर तपासतां येतील.

तुमच्या तयारीबद्दल आणि अभ्यासाबद्दल म्हणाल तर अभ्यास आपल्या सर्वांनाच करावा लागतो. मजुरांना तर तुमच्याहूनदेखील जास्ती. आणि संध्याकाळचा एकदा अभ्यासक्रम घेतला तर त्याबद्दल कांहीं ते मोबदला मागत नाहींत.

आम्हीं पुन्हां एकदां म्हणतों कीं तुमचे कामाचे तास हा संचालक मंडळींनीं तुम्हांला दिलेला विशेष हक्क आहे. त्यामागं त्यांचीं कांहीं खास कारणं आहेत. तो कांहीं संघटनेनं मिळवलेला विजय नाहीं.

**मन खचून जाणं** त्याच बातमीपत्रांत आणखी असं पण होतं कीं हे कामाचे तास कुणाहि सामान्य माणसाच्या मनाच्या नि शरीराच्या शक्तींचा ऱ्हास करायला पुरेसे आहेत.

आपला हात कधींहि गमावण्याची सतत धास्ती असतांना कामगार यंत्रावर दिवसाचे आठ तास काम करतो. त्याच्यासमोर तरी अशाप्रकारें बोलायचं धाडस तुम्हीं करूं नये.

शिवाय पैसे देऊं करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिकवणीला मात्र दमणुकीचा मुद्दा येऊ न देतां होकार देणारे हजारों शिक्षक आहेतच. त्यांना तुम्हीं काढून टाकत नाहीं तोंपर्यंत तुमची बाजू लंगडीच आहे. संघटनेचे हक्क मिळायला पात्र असे कामगार म्हणून तुम्हांला मान्यता देणं कठिण आहे.

**संप** उदाहरणार्थ, संप करण्याचा हक्क. तो प्रत्येक कामगाराचा परमपवित्र हक्क आहे. पण तुमच्यासारखं वेळापत्रक असणाऱ्या माणसानं संपावर जाणं किळसवाणं आहे.

गांधींचा जरा जास्त अभ्यास करा. मग संपाइतकीच प्रभावी पण त्यापेक्षां वेगळीं अशी तंत्रं तुम्हांला उमगतील.

यावर खरा उत्तम उपाय म्हणजे तुम्हीं न्यायाधिशांच्या संघटनेंत सामिल होणं. तुमचं काम न्यायाधिशाच्या कामासारखं असतं - परीक्षा, गुणचर्चा, चांचण्या, अहवाल वगैरे. त्या वेळांत तुम्हीं संपावर जायला हरकत नाहीं.

त्यांऐवजीं जे कांहीं थोडे तास प्रत्यक्ष शिकवायचे पडतात त्यांत तुम्हीं काम करणं थांबवाल, तर तुम्हांला आमच्याबद्दल एवढीशीसुद्धां पर्वा नाहीं असंच लोकांना वाटेल.

## पूर्णवेळ कोण शिकवेल?

सध्यांचं वेळापत्रकं पाहिलं तर शाळा म्हणजे गरिबांविरुद्ध युद्ध आहे. शिकवण्याचे तास सरकारला वाढवतां येत नसतील, तर मग सरकारचा शाळांशीं कांही संबंधच नसावा.

हा अत्यंत गंभीर निष्कर्ष आहे. आतांपर्यंत सरकारी शाळा ही खाजगी शाळांपेक्षां सुधारणेची पुढची पायरी समजली जात होती. कदाचित् आतां आपल्याला प्रत्येकच गोष्टीचा पुन्हां

विचार करावा लागेल आणि शाळा दुसऱ्या कुणाच्या तरी हातीं सोंपवाव्या लागतील. शिकवायची – आणि तें पण आम्हांला शिकवायची – ध्येयवादी ऊर्मि असणाऱ्या कुणाच्या तरी हातीं.

**शब्द जपून वापरा** आपले पाय जमिनीवरच टेकलेले असूं देत.

सकाळच्या वेळीं आणि हिवाळ्यामधें शाळा सरकारला चालवूं द्या. त्या तशाच 'वर्गविहीन' पण राहूं देत. तुमचे शब्द बघा! श्रीमंतांचा वर्गवाद 'वर्गविहीनता' म्हणून ओळखला जातो.

दुपारीं आणि उन्हाळ्याच्या दिवसांत दुसऱ्या कुणाला तरी त्या चालवाव्या लागतील – आणि त्यादेखील वर्गभेदांशिवाय. पुन्हां तुमचे शब्द पहा! वर्गभेदांच्या अभावाला श्रीमंतांकडून 'वर्गीयता' म्हटलं जाईल.

**नगरपालिका** पहिला तोडगा म्हणजे ह्या शाळा नगर-पालिकांकडे सोंपवणं. त्यांचं शाळा चालवणं आम्हांला अनुकूल आहे कीं नाहीं, हें आम्हांला बघूं दे. अस्फाल्टचे रस्ते, नवी प्रकाश-योजना किंवा क्रीडांगण काय राजेशाहीचे पुरस्कर्तेदेखील पुरवूं शकतात.

हें काम नगरपालिकेच्या अखत्यारींत पडत नाहीं असं म्हणून प्रादेशिक प्रशासकीय मंडळानं कानांवर हात ठेवले तर 'हा कायदा तर ३१ सालीं फॅसिस्टांनीं बनवलेला आहे' असा प्रतिवाद लोकांना करतां येईल.

प्रादेशिक प्रशासकावर सारा दोष टाकून स्वतः कांहींहि न करणं नगरपालिकेला सोपंच आहे.

**कम्युनिस्ट** नगरपालिका कदाचित जरासुद्धां बधणार नाहीं. वर्गीय प्रश्नांना तोंड देण्याची वेळ येते तेव्हां कम्युनिस्टदेखील कच खातात. पांढरपेशा कामगारांना आणि दुकानदारांना विरोध करण्याचं धाडस त्यांच्यांत आहे का?

पक्षाचा एक बडा पुढारी अगदी ठांसून सांगत होता - शाळा शासनाच्याच अखत्यारीत असणं आवश्यक आहे. 'आम्हीं सत्तेवर आलों कीं – 'वीस वर्षं उलटलीं. कम्युनिस्ट त्या सत्तेपर्यंत अजूनी पोंचलेले नाहींत. आम्हीं गवत वाढायची वाट बघतों आहोंत, पण तोंपर्यंत गाई मरताहेत ना!

**धर्मोपदेशक** 'दोपोस्कुओला' कदाचित् धर्मोपदेशक चालवूं शकतील. पण ईश्वरासारखं बिनशर्त प्रेम त्यांना नाहीं करतां येत. श्रीमंतांना शिकवायचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांचं सारं आहे तसं चालू देणं असंच ते मानतात.

**संघटना सभासद** कामगार संघटना याच फक्त कामकऱ्यांच्या संस्था आहेत. तेव्हां मग दोपोस्कुओला त्यांनींच सुरूं कराव्या.

पण या संघटनांचे सभासद तूर्त तरी कांहीं नुसतं ऐकायला-सुद्धां तयार नाहींत. त्यांचं म्हणणं असं कीं आधुनिक लोकशाहीमधें प्रत्येक सार्वजनिक संस्थेला स्वतःचं असं काम असतं. आणि तिनं दुसऱ्याच्या कामांत लुडबुड करणं कांहीं बरोबर नाहीं.

तेसुद्धां एका दुबळेपणाच्याच आहारीं गेलेले आहेत. आणि तरीदेखील आजकालचे युवक प्रत्येकच गोष्टीबद्दल उदासीन असतात अशी त्यांची कुरकुर असतेच. संप करायला लोकांना संघटित करणं, नवीन सभासद-नोंदणी करणं, कार्यकर्ते आणि पूर्णवेळ पदाधिकारी मिळवणं-हें दिवसेंदिवस कठिण होत चाललं

आहे असं ते म्हणतात. आणि दरम्यान संचालक मंडळींनीं चाललेल्या शाळांमधें मुलं आपलीं वाढत राहतात.

**निदान प्रयत्न तर करा** पुरेशा ठेंचा खाल्ल्यावर संघटनेचे सन्मान्य सभासद आपले हे विचार बदलतीलहि. पण तोंपर्यंत किमान कांहीं स्थानिक प्रयोग सुरूं करायला त्यांना काय हरकत आहे?

शाळेला तसं लागत तरी काय? कांहीं खडू, फळा, थोडीं जुनीं पुस्तकं, शिकवायला चार मोठीं मुलं, आणि अधूनमधून पैसे न घेतां नवनवीन गोष्टींबद्दल बोलेल-सांगेल असं कुणीहि.

## पूर्णवेळ आणि विषय

**डॉन बोर्धी** आम्हीं हें पत्र लिहीत असतांनाच डॉन बोर्धी (डॉन मिलानींचे धर्मोपदेशक मित्र) आम्हांला भेटायला आले. त्यांनीं आमच्यावर टीका केली : "प्रत्येक मुलानं शाळेंत गेलंच पाहिजे आणि तेंहि पुरतं दिवसभर याबद्दल तुमची अगदीं खात्री झालेली दिसते. पण मग हीं मुलंसुद्धां भोंवतालच्या इतर विद्यार्थ्यां-प्रमाणंच राजकारणाबद्दल उदासीन, आपल्यापुरतंच पाहणारीं बनतील. म्हणजे हुकूमशाहीचीं मुळं रुजायला अगदीं उत्तम जमीन!

"शिक्षक आणि त्यांचे शिकवायचे विषय जोंपर्यंत बदलत नाहींत तोंपर्यंत मुलं जितकीं कमी शाळेंत जातील तितकीं तीं चांगलीं राहतील. यापेक्षां एखाद्या कारखान्यांत खूप चांगलं शिक्षण मिळेल."

"शिक्षण आणि विषय बदलण्यासाठीं तुमचं हें पत्र लिहिण्या-पेक्षां जास्ती कांहीं आपण करणं आवश्यक आहे. हे सारे प्रश्न राजकीय पातळीवरच सोडवले पाहिजेत."

**कांहींच नसण्यापेक्षां बरं** हें खरं आहे. केवळ मध्यमवर्गाच्याच नव्हे, तर साऱ्याच लोकांच्या गरजांचा विचार करणाऱ्या लोकसभेला एखाददुसरा कायदा करून तुमच्या आणि शाळेच्या अभ्यासक्रमाचा बंदोबस्त करतां येईलसुद्धां.

पण त्यासाठीं पहिल्यांदा आम्हांला लोकसभेंत शिरकाव मिळवायला हवा. निग्रोंना गरजेचे असलेले कायदे गोऱ्या लोकांच्या हातून कधींच होणार नाहीत.

लोकसभेंत शिरण्यासाठीं आम्हांला भाषेवर प्रभुत्व मिळवावं लागेल. तेव्हां सध्यां तरी, आहे त्यापेक्षां चांगलं कांहीं मिळत नाहीं तोंवर, मुलांना तुमच्या पद्धतीच्या शाळेंतच जायला हवं.

**व्यवसायिक व्यंग** कांहीं झालं तरी डॉन बोर्धींना वाटतं तितके सारेच शिक्षक कांहीं वाईट नसतात.

कदाचित् त्या शाळांमधून शिकवतांनाच तुमच्यांत या व्यंगाची सुरवात झाली असेल. आमच्याबद्दलच्या कांहीं आकसापोटीं या 'लाडक्या लेकां'ना तुम्हीं झुकतं माप दिलंत असं नसेल कदाचित्. असं झालं असेल कीं ते तुमच्यासमोरच होते. मोठ्या संख्येनं आणि वाजवीपेक्षां बराच काळ. आधीं तुम्हांला त्यांच्या बद्दल जिव्हाळा वाटायला लागला असेल. नंतर त्यांचं कुटुंब, त्यांचं विश्व, अगदीं ते घरीं वाचतात त्या वर्तमानपत्रा बद्दल सुद्धां.

फक्त सुखासीन, नशीबवान माणसंच ज्याला आवडतात तो राजकारणापासून दूरच राहतो. त्याला कशांतच बदल नको असतो.

**गरिबांचा दट्टया** पण आतां गोष्टी बदलायला लागल्या आहेत. तुम्हीं इतक्या विद्यार्थ्यांना नापास करत असतां - तरी शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या वाढतेच आहे.

प्राथमिक गोष्टींची गरज असणाऱ्या बहुजन समाजाच्या वाढत्या दाबामुळं खास पिएरिनोसाठीं आंखलेल्या अभ्यासक्रमच यापुढं चालवणं तुम्हांला जमणार नाहीं.

तुम्हीं दिवसभर शिकवत असाल तर नाहींच नाहीं. गरिबांचीं मुलं तुम्हांला पण नव्यानं घडवतील नि अभ्यासक्रम पण नवा बनवतील.

गरिबांच्या मुलांना समजून घेणं आणि राजकारण आवडणं एकच गोष्ट आहे. अन्याय्य कायद्यांचे बळी झालेल्या माणसांवर प्रेम करायचं आणि तरीहि चांगले कायदे व्हावे म्हणून धडपड करायची नाहीं – हें तर अशक्यच आहे.

## ३. ध्येय

**धार्मिक शाळा** खऱ्या अर्थानं धार्मिक असणाऱ्या धार्मिक शाळा एकेकाळीं होत्या. त्यांच्यापुढं एक ध्येय होतं आणि गांठायला धडपडावं अशा लायकीचंहि तें होतं. पण नास्तिकांसाठीं त्यांनी कांहींच केलं नाहीं.

तुम्हीं काढलेल्या धर्मनिरपेक्ष तोडग्याकडे प्रत्येकजण उत्सुकतेनं पाहात होतां. पण शेवटीं डोंगर पोखरून उंदीरच बाहेर पडला : वैयक्तिक फायद्यासाठीं शाळा!

धार्मिक ध्येय असलेली शाळा आतां नाहींशीच झाली आहे. धर्मोपदेशकांना नवीन व्यवस्थेंत सामावून घेऊन त्यांना पण तुमच्यासारखेंच गुण, पदविका द्यायला सांगितलं आहे. तेहि आतां त्यांच्या मुलांसमोर 'धनेश्वर'च ठेवतात.

**कम्युनिस्ट शाळा** कम्युनिस्ट व्यवस्था याहून कांहींशी बरी शाळा देऊं शकते. आणि तरी शिक्षकं होणं आणि आपले शब्द बेतून बोलणं मला आवडणार नाहीं. मुलांच्या डोळ्यांतले ते वाढते संशय पहाणं – हा खरं तेंच बोलतो आहे कीं निव्वळ वेळ निभावून नेण्यापुरतं कामचलाऊ असं?

समतेसाठीं ही किंमत आम्हांला खरंच मोजायलाच हवी का?

**प्रामाणिक ध्येयाच्या शोधांत** आम्हीं ध्येयाच्या शोधांत आहोंत. मात्र तें खरंखुरं, प्रामाणिक असलंच पाहिजे. उदात्त. आपण 'माणसां'पेक्षां जराहि कमी असणार नाहीं अशी अपेक्षा त्यानं मुलाकडून ठेवली पाहिजे. हें आस्तिक आणि नास्तिक दोघांनाहि मान्य होण्याजोगं आहे.

हें ध्येय मला ठाऊक आहे. मी अकरा वर्षांचा असल्यापासून माझ्या धर्मोपदेशक शिक्षकानं तें माझ्यावर ठसवलं आहे. आणि याबद्दल मी ईश्वराचा ऋणी आहें. मीं इतका वेळ वांचवला आहे! आपण कां शिकतों आहोंत याची जाणीव मला दर क्षणाला होती.

**अंतिम ध्येय** आपलं सर्वस्व दुसऱ्यांसाठी देणं हें ध्येय योग्यच आहे.

चालूं शतकांत आपलं प्रेम तुम्हीं राजकारण, संघटना, शाळा यांच्याद्वारें नाहीं तर कसं दाखवणार? आम्हीं सार्वभौम नागरिक आहोंत. भीक मागण्याचे दिवस आतां निघून गेले आहेत. वर्गभेद, उपासमार, निरक्षरता, वंशभेद, वसाहतींमधलीं युद्धं – यांच्याविरुद्ध आतां आपण प्रत्यक्ष उठलं पाहिजे.

**जवळचं ध्येय** हें अंतिम ध्येय आहे. याची आठवण वेळोवेळीं ठेवली पाहिजेच. पण प्रत्येक मिनिटाला आठवण ठेवलीच पाहिजे असं अगदीं जवळचं ध्येय म्हणजे दुसऱ्यांना समजून घेणं आणि स्वतःला समजून देणं.

यासाठीं फक्त इटालियन भाषा पुरेशी नाहीं. ती जगभर फारशी वापरली जात नाहीं. आणि आपापल्या देशांच्या सीमा ओलांडून माणसांनीं एकमेकांबद्दल मित्रभाव बाळगण्याची गरज आहे. यासाठीं आपल्याला अनेक भाषांचा अभ्यास करायला हवा – जिवंत भाषांचा.

प्रत्येक विषयांतल्या शब्दानीं मिळून भाषा बनते. तेव्हां आपलं शब्दांचं भांडार वाढवण्यासाठीं सगळ्या विषयांचीं निदान ओळख ही करून घेतलीच पाहिजे. आपल्याला प्रत्येक गोष्टीची तोंडओळख असायलाच हवी, आणि बोलण्याचं कसब पण!

**अभिजात कीं शास्त्रीय** लोकसभेंत नवीन माध्यमिक शाळेबद्दल चर्चा चालूं होती तेव्हां आम्हीं मुके लोक गप्पच राहिलों. कारण आम्हीं तिथं नव्हतोंच. इटालींतल्या शेतकऱ्यांसाठीं शाळांची आंखणी करतांना त्यांनाच त्यांतून वगळलं गेलं होतं.

वरकरणीं एकमेकांच्या विरोधी दिसणाऱ्या पण आंतून सारख्याच असणाऱ्या दोन गटांत न संपणारी चर्चा चालूं होती.

ते सगळे 'लिचिओ'चे पदवीधर होते. ज्या शिक्षणपद्धतीनं त्यांना घडवलं तिच्यापलीकडे इंचभरसुद्धां पाहूं न शकणारे. त्यांच्यापैकीं एकादा तरुण आपल्याच सांवलीशी वाद कसा काय घालतो बुवा? त्याच संस्कृतीच्या पठडींतले शब्द वापरायचे आणि स्वतःवर आणि त्या विकृत संस्कृतीवर थुंकायचं हें कसं जमावं?

लोकसभेत दोन तट पडले. उजव्या गटानं शिक्षणपद्धतींत लॅटिन घुसवलं, तर डाव्यानं विज्ञानं पुढं ढकललं. आमची आठवण कुणालाच झाली नाहीं. त्यांच्यापैकीं एकानं पण प्रश्न आंतून पाहिलेलाच नव्हता. तुमच्या शिक्षणपद्धतीनं आम्हांला किती संकटांना तोंड द्यायला लावलं हें एकालासुद्धां ठाऊक नव्हतं.

उजव्या गटांचे लोक एखाद्या संग्रहालयांतल्या वस्तूसारखे होते, तर कम्युनिस्ट म्हणजे प्रयोगशाळेंतले उंदीर. दोघंहि आमच्यापासून इतके दूर! आणि आम्हीं असे कीं आम्हांला तर अजून बोलतां पण येत नाहीं. जिवाच्या करारानं आम्हांला आजची भाषा यायला हवी आहे. कालची नाहीं, आजची. आणि फक्त भाषाच तेवढी – पांडित्य नाहीं!

**सार्वभौम** फक्त भाषाच तेवढी सगळ्या माणसांना समान बनवते. स्वतःचं म्हणणं सांगतां येणारा आणि दुसऱ्याचं म्हणणं समजायची अक्कल असणारा माणूसच तेवढा समान असतो. तो श्रीमंत आहे कीं गरीब हें अवांतर आहे. फक्त त्यानं तोंड उघडलं पाहिजे.

त्या माननीय खासदारांना वाटत होतं कीं कुणाचं तरी पोट शिवून टाकायला किंवा नावामागं 'डॉक्टर' लावायला आम्हीं अगदीं उतावीळ झालों आहोंत. "लायक आणि क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना अगदीं प्रख्यात खानदान नसलेल्याहि विद्यार्थ्यांना, उच्चतम पातळीचें शिक्षण घेण्याचा हक्क आहे." घटनेचं ३४वं कलम.

आपल्या मुलांना जास्ती उच्च ध्येयाचं शिक्षण देण्याचा प्रयत्न आपण करूं या : सार्वभौम बना! 'डॉक्टर', 'इंजीनिअर' हे विसरून जा.

**सामाजिक मानमान्यतेची शिडी चढणारे** आम्हांला साऱ्यांना बोलण्याची ताकद येईल तेव्हां सामाजिक शिडी चढूं पाहणाऱ्यांना खुशाल आपला अभ्यास करत बसूं दे. त्यांनीं विद्यापीठांत जावं, पदव्या बळकवाव्यात, ढिगावारीं पैसा कमवावा, आणि झाडून साऱ्या 'तज्ज्ञ' जागा खुशाल घ्याव्यात.

आजपर्यंत होता तसा सत्तेचा मोठा वांटा मात्र त्यांनीं मागतां कामां नये.

**विरून जा** बिचारा पिएरिनो! मला तुझी दया येते. तुझ्या खास हक्कांसाठीं तू भरमसाट किंमत मोजली आहेस! तुझा खास व्यासंग, तुझीं पुस्तक, सगळ्या तुझ्यासारख्याच लोकांशीं संबंध – यांचा कायम शिक्का तुझ्यावर बसला आहे. तूं हें सगळं सोडत कां नाहींस?

विद्यापीठ, तुझीं कर्तव्यं, तुझे राजकीय पक्ष – सारं सोडून दे आणि शिकवायला सुरुवात कर. फक्त भाषा शिकवायला लाग. बाकी कांहीं नाहीं.

स्वतःला विसरून गरिबांसाठीं वाट काढ. तुझं वाचन थांबव. विरून जा. हेंच तुझ्या वर्गाचं अंतिम कार्य आहे.

**आत्म्याला वांचवणं** तुझ्या जुन्या मित्रांना वांचवायचा प्रयत्न करूं नकोस. त्यांच्याशी बोलायला म्हणून एकदां जरी तूं माघारीं गेलास, तरी मग आजपर्यंत होतास तसाच तू कायमचा राहशील.

विज्ञानाची काळजी तूं करूं नकोस : स्वतःचा स्वार्थ पाहणारे पुरेसेजण नेहमींच त्या क्षेत्रांत असतील. आपल्याला उपयोगीं पडणारे शोधहि ते लावतील. वाळवंटांत ते पाण्याचे कालवे

काढतील, समुद्रांतून व्हेल माशांचे तुकडे आणतील, रोगांवर विजय मिळवतील.

तुला त्याची काळजी कां? अंगच्या गतीमुळं ज्या गोष्टी पुढं जात राहणारच आहेत, त्यांच्यासाठीं तुझ्या प्रेमाचा आणि आत्म्याचा बळी देऊं नकोस.